दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | बुधवार, 8 जुलै 2026 | अंक क्र. 64 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# मुसळधार पावसामुळे विहार तलाव भरला; मुंबईतील पहिला तलाव ओव्हरफ्लो!



मुंबई : मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अखेर मुंबईतील पहिला (विहार) (तलाव) ओसंडून वाहू लागला आहे. मंगळवार, ७ जुलै २०२६ रोजी रात्री ९ वाजता विहार तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर ओव्हरफ्लो झाला. त्यामुळे मुंबईच्या पाणीपुरवठ्याच्या (Water Supply) दृष्टीने हा मोठा दिलासादायक टप्पा मानला जात आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांपैकी आणि मुंबई महापालिका हद्दीतील दोन तलावांपैकी एक असलेला विहार तलाव यंदा सर्वप्रथम भरून वाहू लागला आहे. या तलावाची उपयुक्त जलसाठा क्षमता २७,६९८ दशलक्ष लीटर इतकी आहे. गेल्या काही वर्षांतील आकडेवारी पाहता, २०२५ मध्ये १८ ऑगस्ट, २०२४ मध्ये २५ जुलै आणि २०२३ मध्ये २६ जुलै रोजी विहार तलाव ओसंडून वाहू लागला होता. यंदा जुलैच्या पहिल्याच आठवड्यात तलाव भरल्याने सुरू असलेल्या दमदार पावसाचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या इतर तलावांतील जलसाठ्यातही वेगाने वाढ होत असून, येत्या काही दिवसांत आणखी तलाव ओसंडून वाहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मुंबईकरांसाठी ही नक्कीच दिलासादायक बातमी ठरली आहे.

## रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईकडून डॉक्टर, सी.ए आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स यांचा सत्कार

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)





येथील रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या पदाधिकारी व सदस्य यांनी सेवा हीच आमची ओळख, सेवा हीच आमची प्रेरणा हे ब्रीद जोपासत शहर व परिसरात कार्यरत डॉक्टर, सी.ए. आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले योगदान दिले असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.योगेश गालफाडे यांनी दिली आहे.

शहरातील नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमी, अंबाजोगाई येथे रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई यांनी डॉक्टर्स डे व सी.ए. डे साजरा केला. यावेळी अभिनव संकल्पना राबविली. सेवा हीच आमची ओळख, सेवा हीच आमची प्रेरणा हे ब्रीद जोपासत शहर व परिसरात कार्यरत डॉक्टर, सी.ए. आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.सिद्धेश्वर बिराजदार हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून आए.एम.ए.शाखा अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.राहूल धाकडे व ऍम्पाच्या अध्यक्ष डॉ.सुलभा पाटील व सी.ए.असोसिएशनचे प्रतिनिधी ऍड.सचिन बजाज तर प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.योगेश गालफाडे, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे आणि मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा संपन्न झाला. या उपक्रमाचे हे पहिले वर्ष होते. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई कडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रम आयोजनामागील भुमिका नमूद करताना रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे यांनी सांगितले की, रोटरीच्या माध्यमातून अंबाजोगाई पंचक्रोशीत वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य केले जाईल. समाजाच्या उपयोगी पडेल असे कार्य रोटरीच्या माध्यमातून आम्ही करीत राहू. जिथे कमी तिथे आम्ही ही भावना जोपासून आम्ही कार्य करू व अंबाजोगाईचा सामाजिक वसा व वारसा आम्ही समर्थपणे पुढे घेऊन जाऊत असा विश्वास या कार्यक्रमाच्या माध्यमातून मी सर्वांना देतो.

यावर्षी प्रथमच आम्ही शहर व परिसरात कार्यरत डॉक्टर, सी.ए. आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स बांधव यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी आम्ही रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई प्रयत्नशील राहणार आहोत असे अध्यक्ष रो.शिंदे यांनी सांगितले.

## गोकुळ बागलाने यांनी रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून हजारोंना रोजगार मिळवून दिला : आ .सुरेश धस

■ आष्टी (प्रतिनिधी)





आष्टी पंचायत समितीचे प्रभारी असलेले गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा पुरेपूर वापर करून प्रभावी पद्धतीने काम केले असून विशेषतः महात्मा गांधी रोजगार हमी योजनेद्वारा त्यांनी अत्यंत उत्कृष्ट काम करून विविध योजना अंतर्गत हजारो मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला असून त्यांच्या या प्रशासकीय कामामुळे मी त्यांच्यावर आणखी जबाबदारी सोपवणार आहे अशा प्रशंसोद्गाराव्दारे आ. सुरेश धस यांनी गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांना सेवापूर्ती कार्यक्रमाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

यावेळी व्यासपीठावर माजी आ.साहेबराव दरेकर, सभापती बद्रीनाथ जगताप, माजी सभापती आदिनाथ सानप, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,शरद रेडेकर आदी उपस्थित होते.आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमास मोठ्या संख्येने बीड जिल्ह्यातील अधिकारी ग्रामविकास अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की गोकुळ बागलाने हे अत्यंत मितभाषी परंतु अत्यंत कार्यक्षम अधिकारी होते त्यांचा संयमी स्वभाव असल्याने प्रशासकीय कामकाज अत्यंत चांगल्या पद्धतीने त्यांनी हाताळले महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध कामांना त्यांनी गती देऊन जलसिंचन विहीरी आणि रस्त्यांची कामे केल्यामुळे हजारो मजुरांना रोजगार उपलब्ध झाला आणि नागरिकांना सुविधा निर्माण झाल्या आहेत. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या बीड जिल्ह्यातील अधिकारी पदाधिकारी आणि आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील ग्रामविकास अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित असल्यामुळे ही गोकुळ बागलाने यांच्या कामाची पावती आहे असे सांगत ते म्हणाले की, त्यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे पुढील काळामध्ये अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असून आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील कामांसाठी त्यांची समन्वयक म्हणून त्यांनी काम करावे अशी आपली इच्छा आहे असे सांगून त्यांच्या उर्वरित जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

# ठाकरे यांच्या आदेशानंतर परळीत SIR नोंदणीसाठी शिवसेनेची रणनीती

## आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी विशेष पुनरिक्षण (SIR - Special Intensive Revision) अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने परळी वैजनाथ येथे शिवसेना व युवासेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या सूचनेनुसार आयोजित या बैठकीस शिवसेना संपर्क प्रमुख परशुराम जाधव प्रमुख उपस्थित होते. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तसेच उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे व युवासेना जिल्हाप्रमुख सोमेश्वर गित्ते यांच्या नेतृत्वाखाली परळी तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

बैठकीत मतदार नोंदणी अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, यासाठी बूथनिहाय नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

युवासेना जिल्हाप्रमुख सोमेश्वर गित्ते यांनी विशेषतः 18 ते 25 वयोगटातील नवमतदारांपर्यंत पोहोचून त्यांची नोंदणी करण्यावर भर देत सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्याचे आवाहन केले. जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांनी प्रत्येक वार्डात नोंदणीसाठी मदत केंद्र उभारण्याबाबत निर्देश दिले. बैठकीत घरोघरी संपर्क मोहीम, बूथनिहाय कार्यकर्त्यांची नियुक्ती, आवश्यक कागदपत्रांबाबत नागरिकांना मार्गदर्शन, वार्डनिहाय दैनंदिन अहवाल सादर करणे तसेच पत्रके, भिंतलेखन आणि सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्याची कार्ययोजना निश्चित करण्यात आली.







या बैठकीस उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, तालुकाप्रमुख भोजराज पलिवाल, युवासेना तालुकाप्रमुख ध्यानेश्वर गुट्टे, केज शहरप्रमुख तात्याराव रोड, विशाल गावडे, पप्पू केंद्र यांच्यासह विविध पदाधिकारी, शाखाप्रमुख, महिला आघाडीच्या पदाधिकारी व युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी SIR मोहिमेची मुदत संपण्यापूर्वी परळी तालुक्यात पात्र मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी पूर्ण करण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.




# ५ वाहने गाडली, ठाकूरवाडीचा संपर्क तुटला

**रायगड वृत्तसंस्था**

कर्जत : रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पळसदरी येथील ठाकूरवाडीवर सोमवारी पहाटे निसर्गाने अक्षरशः कहर केला. सलग कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे डोंगराचा मोठा भाग घसरून भीषण दरड कोसळली. या दुर्घटनेत दोन चारचाकी आणि तीन दुचाकी वाहने मातीच्या ढिगाऱ्याखाली दबली गेली, तर वाहनांसाठी उभारलेले शेड पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरड कोसळल्यानंतर ठाकूरवाडीकडे जाणारा मुख्य रस्ता पूर्णपणे मलब्याखाली गेला असून काही ठिकाणी रस्ताच खचल्याने गावाचा बाहेरील जगाशी संपर्क तुटला आहे. डोंगरावरील वस्तीतील नागरिक वाहने रस्त्यालगतच्या शेडमध्ये उभी करत असत; मात्र हीच वाहने काही क्षणांत मातीखाली गाडली गेली.

घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्रांत अधिकारी प्रकाश सकपाळ, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, मंडळ अधिकारी वैशाली पाटील, तलाठी शीतल मंदाडे, ग्रामसेवक अनिल राठोड, पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक शरद रोकडे यांच्यासह महसूल, पोलीस यंत्रणा आणि स्थानिक ग्रामस्थांनी जेसीबीच्या सहाय्याने मदत व मलबा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले.

परिसरातील सुमारे १४० ते १४५ आदिवासी कुटुंबांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना सुरक्षितस्थळी हलविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक रहिवासी गणेश खिरगर यांनी सांगितले की, रात्री दोनच्या सुमारास अचानक मोठा आवाज झाला आणि काही क्षणांत दरड कोसळून गावाचा मुख्य रस्ता मातीखाली गेला. पाऊस कायम राहिल्यास आणखी दरड कोसळण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

सध्या प्रशासन, लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नातून मदतकार्य सुरू असून संपूर्ण परिसरावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

# उरणला चक्री वादळाचा फटका; जेएनपीए पोर्ट मध्ये अंगावर कंटेनर पडून एका कामगाराचा मृत्यू तर दोघे गंभीर जखमी

**रायगड वृत्तसंस्था**

उरण : उरण मध्ये सतत जोरदार पाऊस सुरु असून मुसळधार पावसानंतर शनिवारी मध्यरात्री उरण तालुक्यात वादळी वाऱ्याने जोरदार धुमाकूळ घातला. सतत सुरु असलेल्या वादळी वाऱ्याचा फटका जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरणातील (JNPA) एनएसएफटी (NSFT) टर्मिनलला बसला असून, येथे रचून ठेवलेले रिकामे कंटेनर अचानक कोसळून एका १९ वर्षीय तरुण कामगाराचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. सदर घटना सोमवारी दिनांक ६ जुलै रोजी सकाळी झाल्याचे प्रत्यक्ष दर्शीचे म्हणणे आहे. अमितकुमार किशोर प्रसाद (वय १९, रा. बिहार) असे मृत कामगाराचे नाव आहे. दरम्यान, या गंभीर दुर्घटनेबाबत अधिकृत यंत्रणांनी मौन बाळगल्याने माहिती दडवली जात असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे.सदर माहिती बाबत जेएनपीटी (जेएनपीए )प्रशासन तसेच पोलीस प्रशासनातर्फे कोणतेही त्वरित अधिकृत माहिती मिळाली नसल्याने या अपघाताचे गूढ अधिकच वाढत आहे. पोलीस



प्रशासनाकडे फोन द्वारे चौकशी केली असता एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे व अधिक तपास सुरु असल्याचे एवढेच सांगण्यात आले.मात्र एवढी मोठी दुर्घटना घडली तरी वेळेत आपत्ती व्यवस्थापनचे अधिकारी कर्मचारी वर्ग तिथे पोहोचायला पाहिजे. तसे या घटनेत दिसून येत नाही. कोणतेही इमरजेन्सी (तात्काळ )मदत न मिळाल्याने कामगारांचा मृत्यू झाल्याची सर्वत्र चर्चा सुरु आहे.

समुद्र किनारी असलेल्या वेसेल वर कंटेनर समुद्रातील जहाजात भरताना हा अपघात घडले असल्याचे बोलले जात आहे.मयत कर्मचारी अमितकुमार किशोर प्रसाद याचा मृतदेह उरण शहरातील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला असून, तेथे मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात येणार आहे. याबाबत न्हावा - शेवा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, न्हावा शेवा पोलीस स्टेशनचे पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान या घटनेतून जेएनपीए प्रशासनाच्या अनेक त्रुटी समोर आल्या आहेत.

# नवी मुंबईत मानवी तस्करीवर घणाघाती कारवाई; अल्पवयीनसह दोन मुलींची सुटका, महिला अटकेत

**रायगड वृत्तसंस्था**

नवी मुंबई : मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाविरोधातील मोहिमेला मोठे यश मिळवत नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने धाडसी कारवाई केली. या कारवाईत एका अल्पवयीन मुलीसह दोन पीडित मुलींची सुटका करण्यात आली असून, या प्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दिपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे आणि पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, गौतम नावाचा एक इसम अल्पवयीन मुलींसह महिलांना ग्राहकांकडे वेश्याव्यवसायासाठी पाठवत असल्याची माहिती मिळाली होती.

यानंतर पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून सापळा रचला. आरोपीने मुलींना वाशी येथील सेक्टर



१९-ए मधील प्लॉट क्रमांक २ येथे बोलावले. त्याचवेळी पोलिसांनी छापा टाकून रेखा रंजन मजूमदार (वय ३८) हिला ताब्यात घेतले.

तपासादरम्यान धक्कादायक बाबी समोर आल्या. पश्चिम बंगालमधील एका अल्पवयीन मुलीसह दोन पीडित मुलींना आर्थिक फायद्यासाठी वेश्याव्यवसायात ढकलण्यात आल्याचे निष्पन्न झाले. आरोपी ग्राहकांना पीडित मुलींचे फोटो पाठवत होती आणि त्याबदल्यात तब्बल सहा हजार रुपये स्वीकारत असल्याचेही उघड झाले. या प्रकरणी एनपीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३(३), अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा तसेच पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने ७ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. ही यशस्वी कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मपाल बसाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम, सहायक पोलीस निरीक्षक योगेश देशमुख तसेच सविता म्हात्रे, ज्योती अडकमोल, पावडे, मोहिते, ठाकूर, चव्हाण, कोलते आणि पाटील यांच्या पथकाने केली.

# दि.बा. पाटील यांच्या नावासाठी भूमिपुत्रांचा एल्गार; केंद्र सरकारला ॲड. विवेक भोपी यांचा थेट सवाल

**रायगड वृत्तसंस्था**

पनवेल: नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला दिवसेंदिवस अधिक पाठिंबा मिळत असून, आता या लढ्याने तीव्र स्वरूप धारण केले आहे. आंदोलनाच्या नेत्या कु. रश्मिता पोपेटा यांच्या नेतृत्वाखाली येत्या ८ जुलै रोजी विधानभवनावर पायी दिंडी काढण्यात येणार असून, या आंदोलनात रायगड, ठाणे, पालघर, मुंबई आणि नवी मुंबईसह पाचही सागरी जिल्ह्यांतील भूमिपुत्र मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी, मच्छीमार, कलाकार, गायक, समाजप्रबोधनकार, व्याख्याते, कीर्तनकार, आगरी, कोळी, कराडी समाज तसेच विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते या दिंडीत सहभागी होणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली आहे.

दरम्यान, या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करताना शिवक्रांती सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विवेक भोपी यांनी केंद्र सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकनेते दि. बा. पाटील यांनी शेतकरी, कामगार, प्रकल्पग्रस्त आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी संपूर्ण आयुष्य संघर्ष केला. महाराष्ट्र शासनाने विमानतळ नामकरणाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविल्यानंतरही अद्याप निर्णय घेतला गेलेला नाही. त्यामुळे या प्रस्तावासमोर नेमका कोणता कायदेशीर अथवा प्रशासकीय अडथळा आहे, याचे स्पष्टीकरण केंद्र सरकारने द्यावे. ॲड. भोपी यांनी पुढे विचारले की, "लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आमरण उपोषणाची दखल केंद्र सरकार नेमकी कधी घेणार ? आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनाची वेळ जवळ आली असताना दि. बा. पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यास सरकारला अडचण काय आहे ? की हा विषय जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात येत आहे ?"

त्यांनी स्पष्ट केले की, हा केवळ नामकरणाचा प्रश्न नसून भूमिपुत्रांच्या अस्मिता, स्वाभिमान आणि न्यायाच्या भावनेशी निगडित विषय आहे. हजारो शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या त्यागातून उभारलेल्या या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देणे ही जनभावनेचा सन्मान करणारी बाब ठरेल, असे त्यांनी नमूद केले. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा जनआंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच ८ जुलै रोजी होणाऱ्या विधानभवन पायी दिंडीत राज्यभरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.



# पनवेलला मुसळधार पावसाचा तडाखा; महापौर नितीन पाटील यांच्यासह महापालिका सज्ज; सखल भागांवर विशेष नजर

**रायगड वृत्तसंस्था**

पनवेल : पनवेल शहर आणि परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता लक्षात घेऊन पनवेल महानगरपालिकेने संपूर्ण यंत्रणा युद्धपातळीवर सज्ज ठेवली आहे. आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन, अभियांत्रिकी, आरोग्य, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि सर्व प्रभाग कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी २४ तास फिल्डवर कार्यरत असून नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सखल भाग, पूरप्रवण क्षेत्रे, नाले आणि पाणी साचणाऱ्या ठिकाणांची सातत्याने पाहणी सुरू आहे. तक्रार प्राप्त होताच पथके घटनास्थळी पोहोचून पाण्याचा निचरा करत असून आवश्यकतेनुसार पंपाद्वारे पाणी उपसण्याचे काम सुरू आहे. गाढी नदी पुलाखाली अडकलेली जलपर्णी हटविल्याने नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यात आला आहे.

महापौर नितीन पाटील यांनी स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर यांच्यासह गाढी नदी परिसराची तसेच पोदी-२ येथे झाड कोसळलेल्या घराची पाहणी केली. यावेळी गटारींमधील कचरा तातडीने हटवून चोकअप



चेंबर्सची साफसफाई करण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, रविवारी पावसामुळे बाधित झालेल्या सुमारे ४३५ नागरिकांचे चार तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये सुरक्षित स्थलांतर करण्यात आले असून त्यांना अन्न, पिण्याचे पाणी आणि अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा दिल्याने महापालिकेने नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे, सखल भाग व नाल्यांपासून दूर राहण्याचे तसेच अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचेच पालन करण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# राज्यपाल पुरस्कारप्राप्त पोलीस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांचा सिरसाळ्यात नागरी सत्कार संपन्न

**सिरसाळा : अतुल बडे**

पवित्र श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या परळी वैजनाथ नगरीतील पांगरी (गोपीनाथ गड) येथील कर्तव्यदक्ष पोलीस पाटील तथा "पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कार" प्राप्त ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांचा सिरसाळ्यात श्री. रेणूका माता मंदिर येथे भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला. या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन सिरसाळा व पंचक्रोशीतील लोकप्रतिनिधीं ,जेष्ठ राजकीय,सामाजिक मंडळी यांनी केले असून सदरील कार्यक्रमाचे नियोजन बाळासाहेब नाटकर,संजय जाधव,दत्ता कराड,नितीन निर्मळ,राधाकिसन दराडे,प्रदीप खोसे ,तौफिक भाई सिद्दीकी, कैलास जाधव यांनी केले होते. तर ह्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सिरसाळा गावचे सरपंच शेख नशीब भाई तसेच विशेष उपस्थित परळी नगराध्यक्ष भैय्या साहेब धर्माधिकारी, बाजार समिती सभापती सूर्यभान नाना मुंडे, दीपक तांदळे, नगरसेवक शरद मुंडे, पं.स. सभापती पिंटू मुंडे आणि पं.स. सदस्य माऊली गडदे , माझी उपसभापती बाबासाहेब काळे, माजी पसस वंसतराव राठोड, प्रभाकरराव पौळ , पोहनेर सरपंच फारुक भाई कुरेशी,पुरी महाराज,देवराव काळे,संतोष पांडे,कदम,बडे सर,प्रमोद किरवले,मिलिंद चोपडे,मोहन बडे , अय्युब भाई, आशोक शेप आदीसह सिरसाळा पंचक्रोशीतील नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.सन २०२५-२६ या वर्षासाठी महाराष्ट्रशासनाच्या वतीने प्रदान करण्यात येणारा "पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कार" ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांना जाहीर झाला आहे. पोलीस पाटील म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सामाजिक सलोखा जपणे, शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत सक्रिय सहभाग घेणे तसेच ग्रामस्थांच्या समस्या तत्-परतेने सोडविण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण आणि लोकाभिमुख कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. या पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह व रुपये २५ हजारांची रोख रक्कम प्रदान करण्यात आली आहे. ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांनी आपल्या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि जनहिताच्या कार्यातून पोलीस पाटील पदाची प्रतिष्ठा उंचावली आहे. म्हणून त्यांचा सत्कार सोहळा सिरसाळ्यात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन निर्मळ यांनी तर आभार प्रदर्शन संतोष पांडे यांनी केले.



# कवी दिवाकर जोशी यांची गझल विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

**परळी (प्रतिनिधी)**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाच्या यावर्षीपासून लागू होणाऱ्या अभ्यासक्रमामध्ये सुप्रसिद्ध गझलकार दिवाकर जोशी यांच्या `सलतो उरात काटा` या गझल संग्रहातील `विठ्ठल मला निरंतर` या लोकप्रिय गझलेची निवड झालेली आहे

या विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या जवळपास ४५० महाविद्यालयाच्या बी.ए.(मराठी) तृतीय वर्षासाठी `मराठी गझल` असा ५० गुणांचा स्वतंत्र अभ्यासक्रम निर्धारित केला असून त्यामध्ये गझलेच्या सर्वांगीण अभ्यासाबरोबरच महाराष्ट्रातील काही निवडक गझलकारांच्या गझलांचा अंतर्भाव केला आहे. ही मराठी गझलेच्या दृष्टीने अत्यंत उल्लेखनीय आणि सन्मानाची बाब आहे.

परळी येथील दिवाकर जोशी हे एक नामांकित गझलकार असून ते यापुर्वीही साहित्य व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक पुरस्काराने सन्मानित झाले आहेत. देशपातळीवरील विविध साहित्य संमेलने आणि कविसंमेलनांसाठी ते निमंत्रित असतात. त्यांची हीच गझल महाराष्ट्र शासनाच्या काव्य सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाने सन्मानित झालेली असून महाराष्ट्रातील बऱ्याच शाळांमध्ये दर्शनी फलकावर विराजमान झालेली आहे.

एका प्राथमिक शिक्षकाची कार्यनिष्ठा व अक्षरभक्तीचा महिमा विशद करणारी ही गझल आता पदवी स्तरावरील विद्यार्थी अभ्यासणार आहेत.

त्यांच्या या उल्लेखनीय बहुमानाबद्दल मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री विजयजी वाकेकर, प्रा. राजकुमार यल्लावाड, प्रा. अरुण पवार, प्रा. रा.ज. चाटे, शाहीर अनंत मुंडे, प्रा. संजय आघाव, प्रा. सिद्धार्थ तायडे, पत्रकार रानबाजी गायकवाड, कवी बालाजी कांबळे, कवी सिद्धेश्वर इंगोले, श्री सुनील फुलारी, श्री बंडू आघाव, श्री महेश होनमाने, श्री किरण आटोळकर, श्री चंद्रशेखर फुटके, श्री किरण महाजन सौ.सुनिता कोमावार , सौ. विजया दहिवाळ, सौ. चेतना गौरशेट्टे, प्रेरणा दिक्षित आणि तालुक्यातील शिक्षक, साहित्यिक मंडळींनी सत्कार करून अभिनंदन केले. यानिमित्ताने परळी व परिसरातील विविध स्तरातून दिवाकर जोशी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# परळीतील काही पत्रकारांना भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाची एलर्जी आहे का?

## शहेरयार सय्यद यांचा सवाल

परळी | प्रतिनिधी

परळी शहरातील काही वृत्तपत्रांनी दिनांक ७ जुलै रोजी प्रकाशित केलेल्या बातम्यांमध्ये अधिकृत 'भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद चौक' या नावाऐवजी 'गरुड चौक' असा उल्लेख करून इतिहास, अधिकृत नोंदी आणि भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाचा अवमान केल्याचा गंभीर आरोप सकल मुस्लिम युवक संघटनेचे परळी शहराध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते शहेरयार सय्यद यांनी केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, एखाद्या ठिकाणाचे अधिकृत नाव अस्तित्वात असताना जाणीवपूर्वक वेगळ्या नावाने उल्लेख करणे ही केवळ पत्रकारितेतील चूक नसून, ती सामाजिक तेढ निर्माण करणारी आणि महापुरुषांचा अवमान करणारी कृती आहे. पत्रकारांनी कोणत्याही वैयक्तिक पूर्वग्रहापेक्षा सत्य आणि अधिकृत नोंदींना प्राधान्य दिले पाहिजे.

काही संपादकांनी संबंधित बातमी ऑपरेटरकडून प्रसिद्ध झाल्याचे स्पष्टीकरण दिले असल्याचे सांगत, "वृत्तपत्राचा संपादक म्हणून प्रत्येक बातमीची जबाबदारी तुमची नाही का? पेपर छापण्यापूर्वी त्याचे परीक्षण केले जात नाही का? मग अशा चुका वारंवार कशा घडतात?" असा थेट सवाल शहेरयार सय्यद यांनी उपस्थित केला.

"परळीतील काही पत्रकारांना आणि वृत्तपत्रांना भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाची एलर्जी झाली आहे का?" असा संतप्त प्रश्न उपस्थित करत त्यांनी म्हटले की, अधिकृत नाव डावलण्याचा हा प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही.

ज्या-ज्या वृत्तपत्रांनी 'मौलाना अबुल कलाम आझाद चौक' ऐवजी 'गरुड चौक' असा उल्लेख केला आहे, त्यांनी आपल्या पुढील अंकात ठळकपणे दिलगिरी व्यक्त करून माफीनामा प्रसिद्ध करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अन्यथा, संबंधित वृत्तपत्रे आणि जबाबदार व्यक्तींविरोधात संविधानिक व कायदेशीर मार्गाने तक्रारी दाखल करून योग्य ती कारवाई करण्यात येईल. महापुरुषांचा सन्मान आणि अधिकृत नावाचा आदर राखण्यासाठी आवश्यक ते सर्व लोकशाही मार्ग अवलंबले जातील, असा इशाराही शहेरयार सय्यद यांनी दिला.



# वाहतुकीला अडथळा ठरणारी 100 व्यावसायिकांची अतिक्रमणे हटवली

## जिल्हाधिकारी कार्यालय, नगर नाका चौकात पालिका, वाहतूक पोलिसांची संयुक्त कारवाई

बीड | शहरातील मुख्य बाजारपेठेत रस्त्यावर अतिक्रमण करून अनधिकृतपणे व्यवसाय थाटत वाहतुकीला अडथळा करणाऱ्या अतिक्रमणावर बीड पालिका आणि वाहतूक पोलिसांनी सोमवारी संयुक्त कारवाई करत १०० अतिक्रमण हटवले. यामुळे जिल्हा रूग्णालय, नगर नाका चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नगर रोडने मोकळा श्वास घेतला.

बीड शहरातील रस्त्यावर हातगाडे, हॉटेल चालकांनी अतिक्रमण करून वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण केला होता. गेल्या महिनाभरापासून बीड पालिका आणि जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने अतिक्रमणावर कारवाई केली जात आहे. सोमवारी अहिल्या नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हॉटेल चालकांनी केलेल्या अतिक्रमणावर थेट कारवाई करण्यात आली. जिल्हा न्यायालयासमोरील हातगाडे, नर्सरी, चहाच्या टपऱ्या हटवण्यात आल्या. नगर नाका येथील अतिक्रमणावर थेट कारवाई करण्यात आली. जिल्हा वाहतूक शाखा आणि बीड नगर पालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकाने सलग महिनाभरापासून अतिक्रमण हटाव मोहिम सुरू केली असून महिनाभरात ५०० अतिक्रमण हटवण्यात आलेले आहेत. यातील अनेक अतिक्रमणावर दोन-तीन वेळा कारवाई करण्यात आलेली आहे. ज्या अतिक्रमनधारकांवर तीन वेळा कारवाई करण्यात आलेली असतांना त्यांनी पुन्हा अतिक्रमण करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला अशा अतिक्रमणधारकांवर थेट कारवाई करण्यात येणार आहे. ^



महामार्गावर अतिक्रमण करणाऱ्यांना यापूर्वी दोन वेळा समजावून सांगण्यात आलेले आहे. आज त्या अतिक्रमणावर थेट कारवाई केली. आणखी दोन वेळा समजावून सांगण्यात येईल. मात्र या पुढे जर कोणी महामार्गावर अतिक्रमण करत अडथळा केला तर थेट गुन्हा दाखल होईल.
- वैभव पाटील, पोलिस निरिक्षक, वाहतूक

बीड शहरातील पांगरी रोडवरील अंबिका चौक आणि कॅनॉल रोडवर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. कॅनॉल रोडवर शाळा आणि मंगल कार्यालय असल्याने येथे वाहनांची मोठी गर्दी असते. वाढते अतिक्रमण, रस्त्यावर अवैध वाहन पार्किंग यामुळे या रस्त्यावर कायम वाहतूक कोंडी असते. बीड शहरातील नगर नाका ते रिलायन्स पेट्रोलपंप या मिनी बायपास कॅनॉल रोडवरून सुसाट हायवा धावत आहेत. गर्दीच्या ठिकाणीही हायवाचे वेग कायम असतो त्यामुळे येथील शाळकरी मुले, महिला, दुचाकीस्वार जीव मुठीत घेऊन प्रवास करतात यावर कारवाई होणे अपेक्षीत आहे.

# रस्त्यासाठी रहिवाशांचा मुख्य रस्त्यावर ठिय्या



जालना | जालना शहरातील महानगरपालिका हद्दीतील सोरटीनगर, मयूरी पार्क आणि कृष्णबन सोसायटी या परिसराला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. वारंवार मागणी करूनही रस्ता दुरुस्त केला जात नसल्याने या परिसरातील रहिवाशांनी सोमवारी दुपारी जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. अखेर महानगरपालिका प्रशासन, पोलिस, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मध्यस्थीनंतर रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. नागरिकांनी आंदोलन मागे घेतले. आंदोलनात अमोल वायाळ, कैलास धुमाळ, अ‍ॅड. अंकिता बाहेती आदी उपस्थित होते. या परिसरातील काही रहिवासी ऐन रस्त्यातच बसल्याने बसस्थानक व छत्रपती संभाजीनगर चौफुली या दोन्ही बाजूंनी वाहतूक जाम झाली होती. यात शाळकरी मुलांची बस, खाजगी वाहने, बसेसही थांबल्या होत्या. ४० मिनिटांत जवळपास दोन्ही बाजूंनी १ किलोमीटर अंतरापर्यंत वाहने खोळंबली होती.

# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

● बीड, बुधवार 8 जुलै 2026

Last page

## प्रभू वैद्यनाथाचा आशीर्वाद, दर्ग्यात चादर अन् वृक्षारोपणाचा संकल्प

# खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या दीर्घायुष्यासाठी परळीत विविध सामाजिक-धार्मिक उपक्रम





परळी वैजनाथ | प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि निरोगी आयुष्य लाभावे, या सदिच्छेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) परळी शहर यांच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सर्वधर्मसमभाव, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पंचज्योतिर्लिंग श्री प्रभू वैद्यनाथ मंदिरात महाअभिषेक व विशेष पूजनाने झाली. तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांच्यासह पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभू वैद्यनाथाच्या चरणी खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि यशस्वी सार्वजनिक जीवनासाठी प्रार्थना केली.

यानंतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मलिकपुरा येथील हजरत दावल मलिक शाह दर्ग्याला भेट देत दर्गा शरीफवर पवित्र चादर अर्पण केली. यावेळी देशात शांतता, बंधुभाव आणि खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या उत्तम आरोग्यासाठी मनोभावे दुवा मागण्यात आला.

धार्मिक उपक्रमानंतर दर्गा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थित कार्यकर्त्यांनी यावेळी केला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) ज्येष्ठ नेते ॲड. जीवनराव देशमुख, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील, कार्याध्यक्ष बदरभाई, शिक्षक आघाडी तालुकाध्यक्ष हनुमंत फड, शहर उपाध्यक्ष बाबा शेख, शहर संघटक सद्दाम शेख, श्रीनिवास राऊत, अध्यात्म विकास आघाडी शहराध्यक्ष मोहन मुंडे, विद्यार्थी आघाडी शहराध्यक्ष संग्राम देशमुख, तसेच रमेश गायकवाड, अरुण सपाटे, सोहेल पठाण, गणेश सोळंके, लखन मोरे, चंद्रकांत पठाडे, स्वप्नील पतंगे, गुलाब पिलवटे, ऋषी नावेकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमांमुळे परळी शहरातील सर्वधर्मसमभावाची परंपरा अधिक दृढ झाली असून सामाजिक ऐक्य, पर्यावरण संरक्षण आणि जनसेवेचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## कु.संजीवनी कमलाकर राऊत हीस आंतरराष्ट्रीय कोलाज स्पर्धेत पुरस्कार

### योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्थेकडून कु.संजीवनी राऊत हीचा सत्कार



कु.संजीवनी कमलाकर राऊत

(आंतरराष्ट्रीय कोलाज स्पर्धेतील पुरस्कार प्राप्त स्पर्धक)




अंबाजोगाई - आंतरराष्ट्रीय कोलाज स्पर्धेत पुरस्कार मिळवून अंबाजोगाईचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्थेकडून वार्षिक सर्वसाधारण सभेत कु.संजीवनी कमलाकर राऊत हीचा सन्मानचिन्ह, पुस्तक देऊन सत्कार आणि विशेष कौतुक करताना कर्मचारी सहकारी पगारदार संस्थेचे सचिव राजकुमार साळवी, शेजारी संस्थेचे अध्यक्ष बी.के.मसने, उपाध्यक्ष रवींद्र कदम, कोषाध्यक्ष शिवहार ढगे, संचालक व्यंकटेश चामनर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक डॉ.कमलाकर राऊत दिसत आहेत.

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आंतरराष्ट्रीय कोलाज स्पर्धेत पुरस्कार मिळवून अंबाजोगाईचे नांव उज्ज्वल केल्याबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्थेकडून वार्षिक सर्वसाधारण सभेत कु.संजीवनी कमलाकर राऊत हीचा हार्दिक सत्कार आणि विशेष कौतुक करण्यात आले.

येथील योगेश्वरी माध्यमिक विद्यालयातील राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक डॉ.कमलाकर राऊत यांची कन्या व स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर शाळेची विद्यार्थिनी कु.संजीवनी राऊत हीस रंगोत्सव सेलिब्रेशन या आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेणार्या संस्थेच्या वतीने आयोजित कोलाज मेकिंग स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर बी ग्रेड संपादन केल्याबद्दल मेडल, प्रशस्तिपत्र आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बी डबल प्लस ग्रेड संपादन केल्याबद्दल ट्रॉफी आणि प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. याआधी कु.संजीवनी हीने एम.टी.एस.ऑलिम्पियाड, पुणे यांच्या वतीने आयोजित इयत्ता दुसरीसाठीच्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत राज्यात नववा क्रमांक प्राप्त करून स्पेशल गोल्ड मेडल मिळविले आहे, तसेच याच संस्थेने आयोजित केलेल्या इयत्ता पाचवीसाठीच्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत सिल्व्हर मेडल प्राप्त केले आहे आणि विविध स्पर्धा परीक्षेत नैपुण्य प्राप्त केले आहे. कु.संजीवनी हीने महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने आयोजित राष्ट्रभाषा प्राथमिक परीक्षेत विशेष योग्यता आणि इयत्ता पहिलीपासून प्रतिवर्षी विशेष प्राविण्य संपादन केले आहे. सदरील दैदीप्यमान पुरस्कारासाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी, मुख्याध्यापिका स्वरूपा डिग्रसकर, उपमुख्याध्यापिका दीपाली जाधव, चित्रकला शिक्षिका अंजली हाके, शिक्षक, शिक्षिका यांनी अभिनंदन केले आहे. विशेष म्हणजे योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्थेच्या वतीने नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सचिव राजकुमार साळवी यांच्या हस्ते गुणवंत सभासद पाल्य म्हणून कु.संजीवनी हीचा सन्मानचिन्ह, पुस्तक देऊन सत्कार आणि कौतुक करण्यात आले. अभ्यासा सोबतच चित्रकलेसाठी आपल्या गुरूजनांचे, आई वडिलांचे प्रोत्साहन लाभल्याचे, कु.संजीवनी हीने आपल्या मनोगतात सांगितले. यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्थेचे अध्यक्ष बी.के.मसने, उपाध्यक्ष रवींद्र कदम, कोषाध्यक्ष शिवहार ढगे, संचालक, तसेच सभेसाठी उपस्थित शिक्षक, प्राध्यापक आणि पालकांनी अभिनंदन केले आहे.

## शिक्षक बदली प्रकरण ; तिसऱ्या दिवशीही हिवरा ग्रामस्थांनी शाळा ठेवली बंद !

### गटविकास विस्तार अधिकारी गोविंद कराड,केंद्र प्रमुख पांडे यांची भेट ; ग्रामस्थांनी धरले धारेवर



सिरसाळा (अतुल बडे):

परळी तालुक्यातील हिवरा गोवर्धन येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील भानुदास गुडदे शिक्षकाची प्रतिनियुक्ती बदली केली असल्याने संतप्त ग्रामस्थ व शालेय व्यावस्थापन समितीने एकत्र येत शाळेला टाळे ठोकले आहे. दिनांक ४ जुलै रोजी हिवरा ग्रामस्थांनी अंदोलन करत शाळेला कुलूप ठोकले होते व काल दिनांक ७ जुलै देखील संतप्त ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे एकत्र येत अंदोलन करत शाळा बंद केली. शाळा बंद ठेवण्याचा हा तिसरा दिवस आहे. शिक्षक बदली प्रकरणी संबंधित प्रशासन लक्ष देत नाही. या मुळे हिवरा ग्रामस्थ अधिकच आक्रमक होत आहेत. गटविकास विस्तार अधिकारी गोविंद कराड व केंद्र प्रमुख पांडूरंग पांडे यांनी या ठिकाणी भेट दिली मात्र शिक्षक भानुदास गुडदे यांची अचानक बदली का केली असा मुद्दा उपस्थित करत ग्रामस्थांनी संबंधित

अधिकाऱ्यांना धारेवर धरले . ग्रामस्थांचा रोष पाहता आलेले संबंधित मंडळी निघून गेले.हिवरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक

भानुदास गुडदे यांची लाडझरी केंद्र अंतर्गत असलेल्या दौंडवाडी येथे त्यांची नियुक्त केली आहे. सदरील नियुक्ती माजी आमदार संजय दौंड यांच्या सूचनेवरुन तसेच शालेय व्यावस्थापन समिती दौंडवाडी यांच्या निवेदन मागणी वरुन संबंधित शिक्षकाची प्रतिनियुक्ती केली असल्याचे गट शिक्षण अधिकारी कार्यालय पंचायत समिती परळी वैजनाथ पत्रात म्हटले आहे. बदली रद्द करावी किंवा रिक्त पद तात्काळ भरावे या मागणी वरुन हिवरा ग्रामस्थ आक्रमक झाले. दिनांक २ जुलै रोजी बदलीचे पत्र गट शिक्षण अधिकारी कार्यालय परळी यांनी काढले , हि बाब हिवरा ग्रामस्थांना समजताच दिनांक ४ जुलै रोजी शाळेत उपस्थित शिक्षक, विद्यार्थी यांना बाहेर काढत शाळेच्या गेटला टाळे ठोकले. शिक्षक भानुदास गुडदे अंत्यत हुशार,शिस्तप्रिय व विद्यार्थी घडवणारे शिक्षक असुन आम्हाला हेच शिक्षक या ठिकाणी हवे आहेत अशी भावना व्यक्त करत संतप्त हिवरा ग्रामस्थांनी गेटला टाळे ठोकत अंदोलन केले आहे. काल अंदोलनाचा दुसरा दिवस होता ,आपली मागणी घेऊन ग्रामस्थांनी शाळे पुढे अंदोलन केले परंतु गट शिक्षण अधिकारी कार्यालय परळी व बीड शिक्षण विभाग यांनी दखल घेतली नाही. जो पर्यंत तोडगा निघत नाही तोपर्यंत अंदोलन सुरुच राहिल असा ठाम पवित्रा हिवरा ग्रामस्थांनी घेतला आहे.